लोकमत

## अलोक जत्राटकर : शाहू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त व्याख्यान

# शाहू महाराजांमुळे बहुजन पत्रकारितेला बळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शाहूकालीन अभिजन वृत्तपत्रातून बहुजन वर्गाला न्याय मिळत नव्हता. त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फुटत नव्हती. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीचे महत्त्वाचे अस्त्र असलेल्या बहुजन पत्रकारिता आणि वृत्तपत्रांना राजर्षी शाहू महाराजांनी बळ दिले, असे प्रतिपादन डॉ. अलोक जत्राटकर यांनी सोमवारी केले.

दीपक जाधव



**कोल्हापुरात शाहू स्मारक भवनच्या मिनी हॉलमध्ये डॉ. अलोक जत्राटकर यांनी विवेचन केले.**

शाहू स्मारक भवनच्या मिनी हॉलमध्ये राजर्षि शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्यावतीने शाहू महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार होते. तर व्यासपीठावर डॉ. अशोक चौसाळकर उपस्थित होते.

यावेळी जत्राटकर म्हणाले, वेदोक्त प्रकरणामुळे शाहू महाराजांना अभिजन वर्गाकडून मिळणाऱ्या अन्यायी वागणुकीची झळ बसली होती. त्यामुळे बहुजनांवरील अन्यायाला वाचा फोडणारे आणि त्यांना शहाणं करणारी वृत्तपत्रे निघावीत, अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी दिनमित्र, विजयी मराठा, शिवछत्रपती, तरुण मराठा, आदी बहुजन वृत्तपत्रांना अर्थसहाय केले.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'पत्रकारिता' या चळवळीचे सामर्थ्य शाहू महाराजांनी जाणले होते. त्यामुळे त्यांनी अनेक नियतकालिके, वृत्तपत्रांना मदत केली. त्यावेळची पत्रकारिता ही विशेषत: बहुजनांची पत्रकारिता ही दारिद्र्य आणि गांजलेल्या उपेक्षित समाजासाठीच्या चळवळीचे माध्यम होते.


# गायकवाड, देसाई, जत्राटकर यांना 'दमसा'चे पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने देण्यात येणारा ग्रंथ पुरस्कार संग्राम गायकवाड, संपत देसाई, अलोक जत्राटकर, दिनकर कुंदे, दत्ता घोलप व महादेव कांबळे यांच्या पुस्तकांना जाहीर झाला आहे. रविवारी (दि. १२) शाहू स्मारक भवनच्या मिनी हॉलमध्ये सकाळी ११ वाजता डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

सभेचे पुरस्कार जाहीर झालेले साहित्य व लेखक असे : आटपाट देशातल्या गोष्टी (कादंबरी) संग्राम गायकवाड, कायधूळ (कथासंग्रह) दिनकर कुंदे, एका लोकलढ्याची यशोगाथा (अनुभव कथन) संपत देसाई, मराठी कादंबरी : आशय आणि अविष्कार (संकीर्ण) : दत्ता घोलप (प्रथम प्रकाशन) : निखळ जागर संवेदनांचा, अलोक जत्राटकर ,(काव्य) : वेदनांकित चुंगरांचे संदर्भ - महादेव कांबळे. बालवाङ्मय : माझा राजा शाहूराजा - कु. गायत्री शिंदे, विशेष पुरस्कार : डॉ. गो. मा. पवार


संग्राम गायकवाड


संपत देसाई


अलोक जत्राटकर


गायत्री शिंदे


महादेव कांबळे


दत्ता घोलप


दिनकर कुंटे

पुरस्कार - मराठीतील कलावादी वि. दा. वासमकर, संजय कांबळे, वाळ्याण : रवी राजमाने, महाप्रस्थान : भास्कर जाधव, वर्तमानाचे टोक : जीवन साळोखे, चैत्र पालवी : श्रीधर कुदळे, समकालीन मराठी साहित्य : संपा. दत्ता पाटील, नीलेश शेळके, मनी मानसी : ऊर्मिला आगरकर, आजीची पोथडी : दत्तात्रय मानुगडे, जॉयस्टिक : सोनाली नवांगुळ, सह्याद्रीच्या खोऱ्यात : रघुराज मेटकरी, ऋतुफेरा : सलीम मुल्ला, काळीजकाटा : सुनील जंवजाळ, महर्षी महेश योगी : सुनील पाटील, गाऱ्हाणं : धनाजी घोरपडे, ओळंबा : महेशकुमार कोष्टी, डोन्ट वरी बी हॅपी : सविता नायर, काव्यांजली - अंजली देसाई, होरपळ आणि हिरवळ - योजना मोहिते, कॉ. धनाजी गुरव यांची मुलाखत - संपा. प्रशांत नागावकर, किलबिल गोष्टी - कबीर वराळे, मिथकांचा रंगाविष्कार-दिनेश वाघुवरे, निळ्या लाटा-प्रमोद बाबर, बंधन-किरण कुलकर्णी तरी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन उपाध्यक्ष गौरी भोगले, सहकार्यवाह डॉ. विनोद कांबळे यांनी केले आहे.



# प्रवेश परीक्षांसाठी विद्यार्थ्यांचे 'मिशन अभ्यास'

## प्रशासकीय तयारीलाही वेग

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे प्रवेश परीक्षांच्या तयारीला वेग आला आहे. ऑनलाइन परीक्षांचे समन्वयन करण्यासाठी विद्यापीठाचा संगणक विभाग, तसेच संबंधित अधिविभागातही प्रवेश परीक्षांसाठी पूर्वतयारी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अर्ज करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या नोंदी ठेवणे, त्यानुसार परीक्षाकक्षांची व्यवस्था करणे, ऑनलाइन परीक्षेसाठी संगणकांची उपलब्धता ठेवणे या तयारीसाठी विद्यापीठ प्रशासन सज्ज झाले आहे.

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी २८ मेपासून सुरू होणाऱ्या प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांचे मिशन अभ्यास सुरू झाले आहे. भाषा, विज्ञान, वाणिज्य, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी पदव्युत्तर पदवीला प्रवेशाचा मार्ग मोकळा करणाऱ्या पात्रता परीक्षा क्रॅक करण्यासाठी विद्यार्थ्यांचा कस लागत आहे. दरम्यान, ऑनलाइन प्रवेश परीक्षांच्या प्रशासकीय पातळीवरील तयारीही अंतिम टप्प्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठीच्या विविध अभ्यासक्रमांसाठीची ऑनलाइन प्रवेश परीक्षा प्रक्रिया २८ मे पासून सुरू होणार आहे. १७ एप्रिलपासून ऑनलाइन अर्ज प्रकियेला सुरूवात झाली आहे. याबाबतचे पहिल्या टप्प्यातील वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे. विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येतात. यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा मे अखेरपर्यंत सुरू राहणार आहेत.

### २८ मेपासून प्रवेश परीक्षांना सुरुवात

२८ मे रोजी एम. ए. एमएस्सी, मास कम्युनिकेशन, एमएस्सी भूगोल, अल्कोहोल टेक्नॉलॉजी, शुगर टेक्नॉलॉजी, अॅग्रोकेमिकल, जिऑलॉजी. बी. लिब. एमजेसी, इलेक्ट्रॉनिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा होणार आहेत.


दरम्यान, सध्या ऑनलाइन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षांची तयारी जोरात सुरू आहे. प्रवेश परीक्षांचा अभ्यासक्रम जाणून घेत त्यादृष्टीने अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी विद्यार्थी संबंधित विभागातील तज्ज्ञांची मदत घेत आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवीसाठी कोणत्याही शाखेतून पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षांची तयारी वेगळ्याप्रकारे करावी लागत आहे.

# मेकॅनिकल इंजिनीअरिंगमधील संधी

प्रा. हर्षवर्धन पंडित

मेकॅनिकल इंजिनीअरिंगमधील पदवी - (B. Tech / B. E.) चार वर्षांची असते. याकरिता १२वी नंतर सामायिक प्रवेश परीक्षा देऊन आपल्या स्कोअरनुसार विद्यापीठाशी संलग्न मान्यताप्राप्त शासकीय अथवा खाजगी महाविद्यालयात आपल्याला प्रवेश मिळतो. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम सेमिस्टर पद्धतीमध्ये विभागला असुन लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या मार्गांने विद्यार्थ्यांच्या ज्ञानप्राप्तीचे मूल्यांकन केले जाते.

चार वर्षांत या विद्याशाखेच्या इंजिनीअरिंग ड्रॉईंग, थिअरी ऑफ मशिन्स, मेकॅनिक्स ऑफ मटेरियल्स, मेटालर्जी, फाउंड्री टेक्नॉलॉजी, मॅन्युफॅक्चरिंग इंजिनीअरिंग, फ्लुइड मेकॅनिक्स अशा मूलभूत तत्वांचा, कॅड कॅम, इंजिनीअरिंग मॅथेमॅटिक्स, ऑपरेशन्स रिसर्च, प्रोडक्शन मॅनेजमेंट, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट, इंडस्ट्रियल इंजिनीअरिंग आदी पूरक विषयांचा व मेकॅट्रॉनिक्स, रोबोटिक्स आदी अद्ययावत उपययोजनांचा विविध मशिन्सच्या व सॉफ्टवेअरसंच्या प्रात्यक्षिकांतून शिकवले जातात. पारंपरिक शिक्षणपद्धती बाजूला सारून सध्या आऊटकम बेस्ड एज्युकेशन (OBE) म्हणजेच पदवी संपताना विद्यार्थ्यांने धारण करावयाच्या क्षमता (abilities) व कौशल्ये (skills) यांवर लक्ष केंद्रित करून आठवणे (Remember), समजून घेणे (Understand), उपयोजन करणे (Apply), विश्लेषण करणे (Analyse), मूल्यांकन करणे (Evaluate) व नवनिर्मिती करणे (Create) अशा शास्त्रशुद्ध मार्गांने शिक्षण दिले जाते. विविध उद्योगांना अभ्यास भेटीतुन तसेच इंडस्ट्रियल ट्रेनिंगमधून प्रत्यक्ष निरीक्षण व उपयोजन यांचा अभ्यास केला जातो तर मिनी



व मेजर प्रोजेक्ट्सच्या माध्यमातून शिकलेल्या तत्वांचा विद्यार्थी स्वतः वापर करून प्रश्न सोडवतो.

## उच्च शिक्षण

विविध इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अशा राष्ट्रीय महत्वाच्या संस्थांमधुन तसेच जवळपास सर्वच शासकीय व खाजगी महाविद्यालयांतुन तसेच काही विद्यापीठांतील तंत्रज्ञान अधिविभागांतुन पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. इथे प्रवेशाकरिता गेट (GATE: Graduate Aptitude Test in Engineering) ही प्रवेश परीक्षा द्यावी लागते. साधारणपणे या परीक्षेची तयारी पदवीच्या द्वितीय वर्षांपासून केली जाते. या प्रवेशपरीक्षेतील चांगल्या गुणांवर वरील संस्थांमधील मेकॅनिकल इंजिनीअरिंग खालील थर्मल इंजिनीअरिंग, डिझाइन इंजिनीअयरिंग, मॅन्युफॅक्चरिंग इंजिनीअयरिंग, प्रोडक्शन इंजिनीअयरिंग, कॅड कॅम सीएई, मेकॅट्रॉनिक्स, रोबोटिक्स, ऑटोमेशन, वेल्डिंग टेक्नॉलॉजी, इंडस्ट्रिअल इंजिनीअरिंग, ऑपरेशन्स रिसर्च, फाउंड्री टेक्नॉलॉजी, एनर्जी इंजिनीअरिंग आदी विषयांत पदव्युत्तर पदवी मिळवता येते. ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, बायोमेडिकल ॲप्लिकेशन्स आदी विविध क्षेत्रात मोठे काम करता येऊ शकते.

### पदवीनंतरच्या संधी

- उच्च शिक्षण, संशोधन व शिक्षण क्षेत्रांतील संधी
- उद्योगक्षेत्रात नोकरीच्या संधी : खाजगी क्षेत्रातील संधी, सार्वजनिक क्षेत्रातील संधी
- स्पर्धा परीक्षांमधील संधी
- इनोव्हेशन व स्टार्ट-अप संधी
- उच्च शिक्षण, संशोधन व शिक्षण क्षेत्रांतील संधी

मटा एज्युकेशन

## संशोधन

पदव्युत्तर शिक्षणानंतर विद्यार्थ्यास संशोधनाची अभिरुची असल्यास वरील संस्थातुन तसेच विविध विद्यापीठांतुन संशोधनाच्या संधी उपलब्ध आहेत. ज्यामध्ये औद्योगिक अथवा तांत्रिक समस्येवर संशोधन करून पी. एच. डी. अर्थातच डॉक्टरेट मिळवता येईलच शिवाय देशाच्या विकासात संशोधन मौल्यवान योगदान देऊ शकते. या संशोधनातील महत्वाच्या शोधांतून विद्यार्थी स्वामित्व हक्क अर्थातच पेटंट्स घेऊन ते टेक्नॉलॉजी ट्रान्सफरच्या साहायाने उद्योगांना व सरकारला देऊन अर्थप्राप्ती करू शकतो. मेकॅनिकल इंजिनीअरिंगमधील पदवीसोबतच काही अधिक टेक्निकल स्किल्स विद्यार्थी मिळवू शकतो. गरजेनुसार विविध अद्ययावत कौशल्याधिष्ठित शॉर्ट टर्म, मेडीयम टर्म व लॉन्ग टर्म ट्रेनिंग कोर्सेस केल्याने विद्यार्थ्याला नोकरीमध्ये अधिक विश्वास प्राप्त होतो. असे काही कोर्सेस शिवाजी विद्यापीठातील ॲडव्हान्सड टेक्नॉलॉजी सेंटर येथे इंडो-जर्मन टूल रूमच्या सहकार्याने चालू आहेत.

### स्पर्धा परीक्षांमधील संधी

यूपीएससी अर्थातच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) तथा भारतीय वन सेवा (आयएफएस) आदी परीक्षांमध्येसुद्धा ऑप्शनल विषयांमध्ये विद्यार्थ्याला मेकॅनिकल इंजिनीअरिंग हा विषय एक घेता येतो. इंडिअन इंजिनीअरिंग सर्व्हिस (IES) या प्रतिष्ठित परीक्षेतून विद्यार्थ्याला नोकरीच्या उत्तम संधी आहेत. या परीक्षेतील गुणवंतांना सरकारच्या अखत्यारीतील रेल्वे, टेलिकॉम, बॉर्डर रोड, सीपीडब्ल्यूडी, नॅशनल हायवे ॲथॉरिटी ऑफ इंडिया, ऑर्डिनन्स फॅक्टरी आदी सरकारी आस्थापनांमध्ये क्लास वन टेक्नो मॅनेजिरियल नोकरीच्या संधी मिळू शकतात.

एमपीएससी अर्थातच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षा जशा की महाराष्ट्र इंजिनीअरिंग एक्झामिनेशन, प्रशासकीय सेवा, आर.टी. ओ., वन सेवा, काही तांत्रिक पदे तसेच अगदी पॉलिटेक्निक्समधील लेक्चरर पोस्टकरीतादेखील पदे भरली जातात.

एसएसबीद्वारे टेक्निकल पोस्ट्सची भरती भारतीय लष्कर, हवाई दल व भारतीय नौसेना यांमध्ये केली जाते ज्याला अभियांत्रिकी पदवी गरजेचे आहे.

## शिक्षण क्षेत्र

शिक्षण क्षेत्रात पॉलिटेक्निक्समध्ये डिप्लोमा तसेच इंजिनीअरिंग कॉलेजेसमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणाकरिता अध्यापकपदावर काम करता येऊ शकते. याकरिता नियमांप्रमाणे पदव्युत्तर पदवी (एम. टेक अथवा एम. इ) तसेच पी. एच. डी. असणे गरजेचे आहे.

## सार्वजनिक क्षेत्रातील संधी

या अंतर्गत आपण ज्याला PSU - Public Sector Undertaking अर्थातच भारत सरकार अधिपत्याखालील विविध सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांचा समावेश होतो. ज्यामध्ये भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, इंडिअन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड, माझगाव डॉक शिपबिल्डर्स लि., न्यूक्लियर थर्मल पॉवर कार्पोरेशन, ऑइल ॲंड नॅचरल गॅस कॉ. लि., भारत हेवी इलेक्ट्रिकल लि. यांसारख्या संस्था गेटच्या चांगल्या स्कोअरवर अभियंत्यांची नेमणूक करतात.

## उद्योगक्षेत्रात नोकरीच्या संधी

खाजगी क्षेत्रातील संधी : खाजगी क्षेत्रात अटोमोबाईल, कॅड कॅम, फौंड्री, मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रांमध्ये कुशल अभियंत्यांची नितांत गरज असते. यामध्ये अगदी ऑन जॉब वर्क, रिसर्च व डेव्हलपमेंट तसेच व्यवस्थापकीय पदांवर नोकरीच्या संधी असतात. कामातील हुशारी, सॉफ्ट स्किल्स, उत्तम संवाद कौशल्ये यांच्या जोरावर बढतीच्या उत्तम संधी असतात. खाजगी क्षेत्रात आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये परदेशांत काम करता येते.

## इनोव्हेशन व स्टार्ट-अप संधी

प्रत्येक विद्यार्थी नोकरी करेलच असे नाही. काही अभ्यासू, जिज्ञासू विद्यार्थी समाजातील समस्या, शेतीतील समस्या, वृद्ध- दिव्यांग- दिव्यदृष्टी - महिला- बालके यांच्या सुरक्षितता व सोयीकरिता, उद्योगांतील आव्हानात्मक प्रश्न आदींचा अभ्यास करून त्यावर इनोव्हेटिव्ह प्रोडक्ट्स, उपकरणे तयार करतात ज्यामुळे जीवनमान सुकर व समृद्ध होण्यास मदत होईल.



तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम् यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत तंजावरचे शिवाजीराजे भोसले, कुलसचिव मुथ्थुकुमार, अवनीश पाटील, विवेकानंद गोपाळ.

# तंजावर विद्यापीठाशी सामंजस्य करार लवकरच

कोल्हापूर टाइम्स टीम

तंजावर (तमिळनाडू) येथील तमिळ विद्यापीठ आणि सरस्वती महाल ग्रंथालय यांच्यासमवेत तंजावर पेपर्स आणि तंजावरी मराठी भाषा अभ्यासासंदर्भात सामंजस्य करार करण्याबाबत तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम् यांच्याशी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची यशस्वीपणे चर्चा झाली. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी या संदर्भात नुकतीच विद्यापीठाच्या अभ्यासकांसमवेत तंजावरला भेट दिली.

तंजावर येथील तमिळ विद्यापीठाने मराठा इतिहास आणि मराठी भाषेसंदर्भातील चाळीस हजारहून अधिक कागदपत्रे जतन करून ठेवलेली आहेत. या विद्यापीठाशी तंजावर पेपर्स आणि तंजावरी मराठी भाषा अभ्यासासंदर्भात सामंजस्य करार शिवाजी विद्यापीठाच्या विचाराधिन होता. मोडी कागदपत्रांसह हजारो मराठी ग्रंथ संशोधकांना अभ्यासासाठी ते सहज उपलब्ध व्हावे यासाठी ग्रंथालयाबरोबरही सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठ नवे म्युझिअम साकारत असून या म्युझिअममध्ये तंजावर येथील मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित दालन उभारण्यासंदर्भातही सकारात्मक चर्चा झाली. सरस्वती महल ग्रंथालयातील उपलब्ध अभ्यास साधनासंदर्भात तंजावरचे जिल्हाधिकारी ए. अण्णादुराई यांच्यासमवेतही स्वतंत्र बैठक झाली. दोन्ही बैठका तंजावरचे राजे शिवाजीराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झाल्या.

तमिळ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सी. बालसुब्रम्हण्यम्, कुलसचिव मुथ्थुकुमार यांच्यासह तमिळ विद्यापीठातील डॉ. विवेकानंद गोपाळ, डॉ. जयकुमार, डॉ. कविता, डॉ. शीला, नीलकंठ उपस्थित होते; तर, शिवाजी विद्यापीठाच्य वतीने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. निलांबरी जगताप, गणेश नेर्लेकर उपस्थित होते.

# ‘सामाजिक बांधिलकी महत्त्वाची’

कोल्हापूर टाइम्स टीम

‘भारतातील पत्रकारितेला गौरवशाली परंपरा आहे. गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञान बदलले असले तरी माध्यमांची सामाजिक बांधिलकी अटळ आहे’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित माध्यमांची ‘समाज उभारणीतील भूमिका’ या विषयावर ते बोलत होते.

सेवा संघाने घेतलेल्या निबंध स्पर्धेमधील विजेत्या आर. डी. नार्वेकर, सुनीता आसबे, ब्रम्ह विलास पाटील, शिवाजी सूर्यवंशी, मंगल जाधव, शशिकला चौधरी, सिमा शहा यांना इचलकरंजी प्रोबस संघाचे डी. एम. कस्तुरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पारीतोषिक देवून गौरविण्यात आले. वार्षिक अहवाल स्पर्धेमधील व विजेत्या यशवंत आप्पा जगताप, राम समर्थ संघ, रामपूरवाडी, कवठे महांकाळ, डॉ. विलास पाटील, क्रांतीसिंह संघ कुंडल, निवृत्ती धनवडे, तासगाव संघ, रवींद्र सौंदत्तीकर, प्रोबस संघ इचलकरंजी, मुकुंद गणबावले, संभापूर, शिरोळ या स्पर्धकांना प्रा. अे. आर. जयतीर्थ यांचे पारितोषिके देऊन सन्मान केला.



राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक संघाच्या वर्धापनदिनी आयोजित कार्यक्रमात रजनी हिरळीकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

**राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक सेवा संघाच्या वर्धापनदिन**

वर्धापनदिनानिमित्त रजनी हिरळीकर यांच्या ‘बंधमुक्त’ व ‘आई विनोबाची’ या दोन पुस्तकांचे प्रकाशन प्रा. डॉ. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. निबंध स्पर्धेचे प्रायोजक प्रा. अे. आर. जयतीर्थ व संघ अहवाल स्पर्धेचे प्रायोजक प्रा. डॉ. आदेश हार्डीकर आहेत. स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. एम. व्ही. देशपांडे, श्री. अरविंद दीक्षित व प्राचार्य डॉ. पी. पी. कुंभार संघास सहकार्य केले. सचिव श्रीकांत आडिवरेकर यांनी राजर्षी शाहू ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचा वर्धापनदिनानिमित्त आढावा घेतला. ज्येष्ठ सेवा संघ केवळ ज्येष्ठांसाठी जसा आहे, तसा समाजातील आबालवृद्धांसाठीही आहे अशी भूमिका संघाची आहे. नजीकच्या काळात लोकांना अल्पदरात भाजीपोळी केंद्र उपलब्ध करून देण्याचा विचार आहे. सुरेश मिरजकर यांनी आभार मानले, संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य एम. डी. नार्वेकर, के. बी. गुरव, शोभा पोर्लेकर, दिलीप जोशी, मारूती शिंदे, गिरी आदींनी नियोजन केले.

# प्रा. दौलत नांगरे यांना पीएच.डी.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागातील दौलत नांगरे यांना केमिकल इंजिनिअरिंगमधील 'मॉडेलिंग अँड सिम्युलेशन ऑफ हायब्रीड प्रोसेस फॉर सेपरेशन ऑफ अझिओटरॉपिक मिक्शचर्स' या विषयावरील संशोधनासाठी पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांना नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे येथील निवृत्त चीफ सायंटिस्ट डॉ. मायादेवी यांचे मार्गदर्शन लाभले. विभागातील प्रा. जयदीप बागी, प्रा. पी. डी. पाटील यांचे सहकार्य मिळाले.





कोल्हापूर : इलेक्ट्रॉनिक्स बाईक्स सोबत अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी व विद्यार्थी.

# तंत्रज्ञान अधिविभागात इलेक्ट्रॉनिक्स बाईकची निर्मिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी ओंकार पोखरकर, क्षितिज लालसरे आणि अनुजा मोहिते यांनी बॅटरीवर चालणाऱ्या 'इलेक्ट्रॉनिक बाईक'ची निर्मिती केली. ही मोटरसायकल संपूर्णतः बॅटरीवर चालणारी आहे.

या मोटारसायकलमध्ये स्पीडोमीटर, इंडिकेटर, हॉर्न, ब्रेक, एक्सलेरो मीटर अशा प्रकारच्या सुविधा असून, ही गाडी चालवताना नेहमीचे वाहन चालवल्यासारखा अनुभव येतो. बॅटरी वगळता या मोटारसायकलचा खर्च फक्त १४ हजार इतका आला असून, कुठल्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. ही गाडी विद्यार्थ्यांनी दैनंदिन कामकाजासाठीसुद्धा वापरली असून १०० कि.मी. पेक्षा जास्त अंतर पार केले आहे.

तीन तास चार्ज केल्यानंतर ही गाडी अंदाजे ६५ किमी धावते. तसेच जास्तीत जास्त स्पीड हे ताशी ५० कि.मी. आहे. या गाडीच्या डिझाईनसाठी विभागाचे समन्वयक डॉ. शामकुमार चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे प्रोत्साहन मिळाले.



शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांसमवेत मार्गदर्शन शिक्षक.

# ओंकारच्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :** येथील ओंकार शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय व राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालयातील चार विद्यार्थिनींना शिवाजी विद्यापीठाची प्रत्येकी पाच हजार रुपये इतकी गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली.

ऋतुजा पाटील, प्रिया भोसले, अंकिता मासाळकर, शामल सुतार यांना शिष्यवृत्ती मिळाली असून त्यांना डी. जी. चिघळीकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्र. प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण यांच्या हस्ते त्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश देण्यात आले. अनिल पाटील, स्वयंप्रभा सरमगदूम, प्रकाश कांबळे, राजेंद्र तराळ यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# डॉ. आप्पासाहेब पवार इतिहास घडविणारे इतिहासकार

## डॉ. आनंद पाटील

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक क्रांतीचे जनक डॉ. आप्पासाहेब पवार हे केवळ जागतिक पातळीवरचे इतिहास संशोधक होते, असे नाहीतर इतिहास घडविणारे इतिहासकार होते. त्यांनी राजाराम कॉलेजचे प्राध्यापक, महाराष्ट्राचे शिक्षण संचालक आणि शिवाजी विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू या भूमिका पार पाडत असताना आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचे



चरित्र ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी उपस्थित प्रा. किसनराव कुराडे, डॉ. आनंद पाटील यांच्यासह अन्य.

सखोल संशोधन करत असताना ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे, म्हणूनच त्यांना इतिहास घडविणारे इतिहासकार मानले जाते, असे प्रतिपादन डॉ. आनंदराव पाटील यांनी केले.

सीतायणकार ज्येष्ठ लेखक प्रा. किसनराव कुराडे यांनी लिहिलेल्या गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार या चरित्रग्रंथाचे प्रकाशन करत असताना ते बोलत होते.

डॉ. पवार यांच्या जयंती निमित्त डॉ. आप्पासाहेब पवार प्रबोधिनी व शिवाजी विद्यापीठ कमवा व शिका योजना यांच्या वतीने हा प्रकाशन सोहळा विद्यापीठाचे प्र.कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेला होता. यावेळी डॉ. सी. टी. पवार, प्राचार्य सरगर, डॉ. नाईक या चरित्र ग्रंथाचे लेखक प्रा. किसनराव कुराडे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात कमवा व शिका योजनेंतर्गत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. एस. टी. हजारे, जी. पी. माळी, युवराज कदम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सकाळ

# शास्त्रज्ञ निर्मितीला वास्तवतेचे स्वरूप

## प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी 'रयत'चा एक कोटीचा निधी



सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ८ :** पारंपरिक शिक्षणाबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या रयत शिक्षण संस्थेने आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांतून संशोधक आणि शास्त्रज्ञ, उद्योजक निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले आहे. संशोधक वृत्तीच्या विद्यार्थ्यांना मदत देण्यासाठी एक कोटी रुपयांचा निधीही संस्थेने उभारला आहे.

दरम्यान, संस्थेतील महाविद्यालये, माध्यमिक शाळांतील प्रज्ञावंत मुलांना पाच हजार रुपयांची स्कॉलरशिप दिली जात आहे. संशोधक विद्यार्थ्यांना सायन्स टेक्नॉलॉजी सेंटरशी संलग्न केले असून, त्यांना त्यांच्या कल्पनेतील संशोधनातून नवनिर्मितीपर्यंत मार्गदर्शन आणि निधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संस्थेने उचलली आहे. याबाबतची माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी दिली.

तळागाळातील मुलांच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उभारलेल्या रयत शिक्षण संस्थेनेही आता बदलत्या काळाप्रमाणे कात टाकली आहे. स्वतंत्र विद्यापीठ स्थापनेकडे वाटचाल करणाऱ्या संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा विडा उचलला.

### विद्यार्थ्यांची गरुडभरारी...

- देशपातळीवर इस्त्रोने निवडलेल्या शंभर मुलांत 'रयत' माध्यमिक शाळांतील दोन विद्यार्थी
- संस्थेच्या १०६ शाळांत २२ कोटी रुपयांच्या अटलरिकरिंग लॅब सुरू
- संशोधक विद्यार्थी तयार करण्यासाठी संस्थेच्या शंभर शाखांना दहा कोटी रुपयांचा निधी संस्थेने दिला
- मोटारीच्या बहुद्देशीय डिस्प्लेचे विद्यार्थिनीकडून संशोधन
- विद्यार्थ्यांनी शोधले पिकांतील तण मारण्याचे यंत्र
- उंब्रज (ता. कऱ्हाड) येथील विद्यार्थ्याकडून शेतीची १८ कामे करणाऱ्या यंत्राची निर्मिती
- श्रीगोंद्याच्या विद्यार्थ्यानि शोधले लॉन कापण्याचे मशीन (जैन इरिगेशनकडून संशोधनाची खरेदी)
- वाशी (मुंबई) सेंटरमध्ये व्हिटॅमिन डी संदर्भात संशोधन
- संस्थेच्या विविध सायन्स टेक्नॉलॉजी पार्कमध्ये रोबोटिक, ड्रोन सेक्टरबाबत संशोधन

> ग्रामीण भागातील मुले प्रज्ञावंत आहेत. त्यांच्यातील शास्त्रज्ञ शोधून त्यांना मदत करत आहोत. आता 'रयत' मधून देशाला, समाजाला मदत करणारे शास्त्रज्ञ आणि उद्योजक निर्माण होत आहेत.
>
> - डॉ. अनिल पाटील (कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था)

9 MAY 2019
तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञान अधिविभागात इलेक्ट्रॉनिक बाईकची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांची कामगिरी; इंधनाची आवश्यकता नाही



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील बी. टेक. इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'इलेक्ट्रॉनिक बाईक'ची पाहणी करताना संचालक डॉ. जयदीप बागी. सोबत डॉ. शामकुमार चव्हाण, ओंकार पोखरकर, क्षितिज लालसरे, अनुजा मोहिते.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील बीटेक इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी ओंकार पोखरकर, क्षितिज लालसरे आणि अनुजा मोहिते यांनी बॅटरीवर चालणाऱ्या 'इलेक्ट्रॉनिक बाईक' ची निर्मिती केली. सदरची मोटारसायकल ही संपूर्णत: बॅटरीवर चालणारी असून ती चालविण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या इंधनाची आवश्यकता नाही. इंधनासाठी होणारा खर्च लागत नसल्याने खर्चामध्ये पूर्णत:बचत होते.

इलेक्ट्रॉनिक बाईकच्या मोटारसायकलमध्ये स्पीडोमीटर, इंडिकेटर, हॉर्न, ब्रेक, एक्सलेरो मीटर अशा प्रकारच्या सुविधा असून, ही गाडी चालवताना नेहमीचे वाहन चालवल्यासारखा अनुभव येतो. बॅटरी वगळता या मोटारसायकलचा खर्च फक्त १४ हजार इतका आला असून, कुठल्याही प्रकारचे प्रदूषण यामुळे होत नाही. तसेच ही गाडी चालवताना कुठल्याही अडचणींचा सामना करावा लागत नाही.

ही गाडी विद्यार्थ्यांनी दैनंदिन कामकाजासाठीसुद्धा वापरली असून १०० किलो मीटरपेक्षा जास्त अंतर पार केले आहे. ३ तास चार्ज केल्यानंतर ही गाडी अंदाजे ६५ किमी धावते तसेच जास्तीतजास्त स्पीड ताशी ५० किमी आहे.

या गाडीच्या डिझाईनसाठी व प्रकल्पासाठी मार्गदर्शन विभागाचे समन्वयक डॉ. शामकुमार चव्हाण यांनी केले.

यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांचे प्रोत्साहन मिळाले. या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचेही बहुमोल मार्गदर्शन व प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांचेही प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 MAY 2019

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षांचे निकाल १५ जुलैपर्यंत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून नवीन कायद्यानुसार लोकशाही पद्धतीने स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे उन्हाळी परीक्षांचे निकाल १५ जुलैपर्यंत लागणार आहेत. या पार्श्वभूमीवर ६४० परीक्षांपैकी २० परीक्षांचे निकाल तयार आहेत.

शिवाजी विद्यापीठातील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका लोकशाही पद्धतीने व्हाव्या, अशी विद्यार्थी संघटनांकडून वारंवार मागणी होत होती. २०१६ च्या विद्यापीठ कायद्यानुसार २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लोकशाही पद्धतीने निवडणुका होणार आहेत. त्यामुळे निकाल वेळेत लावणे आवश्यक असल्याने परीक्षा विभागाच्यावतीने युद्धपातळीवर परीक्षेची कामे सुरू आहेत. लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी विद्यापीठातील परीक्षा विभागातील कर्मचारी आणि अधिविभागातील प्राध्यापकांना निवडणूक ड्युटीसाठी नियुक्ती केली नसल्याने परीक्षेची कामे वेळेत होतील अशी शक्यता आहे. यंदा ६४० परीक्षांसाठी जवळपास २ लाख ९० हजार विद्यार्थी बसले होते. या विद्यार्थ्यांच्या जवळपास १८ लाख उत्तरपत्रिका आहेत. त्यामुळे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मदतीनेच उत्तपत्रिकांची तपासणी वेळेत होणार आहे.

**स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुकांसाठी अर्ज भरण्यासाठी अडचण नाही**

स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुकीसाठी विद्यार्थ्यांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कोणती अडचण येऊ नये म्हणून निकाल वेळेत लागणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने परीक्षा विभाग काम करीत आहे.